निरपराध जनतेला वेठीस धरणारा भारतीय कायदा !!-

# I.P.C. sec. ४९८ अ

## (हुंडा प्रतिबंधक कायदा)

- ४९८ अ, या कायद्याचे मूळ उद्दीष्ट काय होते ?
- ४९८ अ, हा कायदा समस्त पुरुषांविरोधात आहे का ?
- ४९८ अ, या कायद्याच्या कलमाविरुध्द संरक्षण आहे का ?
- ४९८ अ, व इतर कोणते कायदे स्त्रिया पुरुषांविरुध्द सर्रास वापरतात
- ४९८ अ, या कायद्याचा गैरवापर कसा केला जातो ?
- ४९८ अ, मध्ये अटकपूर्व जामीन मिळतो का ?



ॲड. अरूण गो. देशमुख

## मनोगत

४९८ ए (हुंडा प्रतिबंधक कायदा) हे पुस्तक मला तसे खूप वर्षांपूर्वी म्हणजे सुमारे २०१० ला फडकेसरांनी सुचविले होते. ज्याचे कव्हरपेज तयार होऊन ७-८ वर्षे होऊन गेली. असे खऱ्या अर्थाने रखडलेले पुस्तक. घटस्फोट आणि पोटगीवरचे माझे कायद्याविषयक असणारे पुस्तक जोरदार चालल्याने प्रकाशक श्री. अनिल फडके यांनी याच विषयास अनुसरून असणारा हुंडा प्रतिबंधक कायदा अर्थात ४९८ ए यावर पुस्तक लिहिण्यास सुचविले. आणि त्याचेच फलित म्हणजे प्रस्तुत ४९८ ए वरचे हे पुस्तक.

आज महाराष्ट्रात १०० लग्ने होत असताना त्यातील किमान ४० टक्के जोडपी ही जीवनात कोणत्या न कोणत्या तरी वेळी कौटुंबिक न्यायालयाचे दरवाजे ठोठावत आहेत. सामाजिक संस्थांपासून अनेक जणांनी याविषयी चिंता वेळोवेळी व्यक्त केलेली आहेच. मी मात्र या पुस्तकाने आपणासमोर आणणार आहे ते म्हणजे कायदा चांगल्यासाठी बनविल्यावरही त्याचा गैरफायदा घेण्याच्या प्रवृत्तीचा प्रकार उघड करणार आहे. या प्रवृत्तीमुळेच खऱ्याखुऱ्या बळींना कधी कधी न्याय मिळत नाही.

आज वकील वर्गातही काही प्रवृत्ती आहेत. ज्या पॅकेज घेतल्याप्रमाणे पोटगीचा दावा अधिक अंतरिम पोटगीचा दावा अधिक डोमेस्टिक व्हॉयलन्सचा दावा अधिक ४९८ ए चा दावा व त्यानंतर घटस्फोटाचा दावा असा एकापाठोपाठ एक असा दावा मुलांच्या बाजूवर बॉंबसारखे टाकत जातात. यामध्ये नवऱ्याच्या बाजूची मंडळी तर अगदीच अगतिक होऊन जातात. एकवेळ नवरा व त्याचे आई-वडील इथपर्यंत दावा करणाऱ्या मुलीची मानसिकता समजून येते मात्र मुद्दामहून दबावतंत्राचा वापर करण्यासाठी मुलाची विवाहित बहीण तिचा नवरा, तिचे सासू-सासरे किंवा मुलाची वहिनी, तिचे भाऊ, इ. किंवा मुलाचे मामा, मामी, काका-काकू यांचीही नावे गुंफली जातात. यात कधी कधी अशा आरोपामुळे त्या मुलाचे व त्याच्या एकूणच नातेवाइकांचे चांगलेच फाटते किंवा त्यांच्यातील वीण अधिकच घट्ट बांधली जाते. वीण घट्ट झाली तर चांगलेच आहे पण विसवली तर एकामुळे इतर नात्यांमध्येही घटस्फोटाची बीजे यामुळे रोवली जातात व हेच कारण नसतानाचे पाप दावा ठोकणारी कधी कधी नासमज होत करीत जाते. यामुळे मूळ दाव्यातील अनेक पदर वाढवले जातात, नवनवीन गोष्टी तयार केल्या जातात व एकूणच मुलांच्या बाजूने भरगच्च अशी एकरकमी पोटगी आणि / किंवा घर अशा काही अटी गळी उतरविण्यात मुलींचे पक्षकार यशस्वी होतात. आज या ब्लॅकमेलिंगच्या प्रकारामुळेच सर्वोच्च न्यायालयाने ४९८ ए चा दावा ठोकणाऱ्या मुलींच्या आरोपातील

तथ्य संबंधित पोलीस ठाण्याने तपासल्यावरच मुलांकडच्याच्यावर ४९८ ए ची केस नोंदवावी असे स्पष्ट निर्देश दिलेले आहेत. अन्यथा पूर्वी तर सर्वच्या सर्व मंडळी पोलिसी कारवाईला तात्काळ सामोरे जायची.

पूर्वी एकत्र कुंटुब पद्धत असायची. ७०-८० वर्षांपेक्षा जास्त वयाच्या आजोबा/आजीचे मत महत्त्वाचे ठरायचे. घरात आलेल्या सुनेला साहजिकच आधार असायचा. सासूलाही आपल्यापेक्षा मोठे कोणीतरी आहे ह्या गोष्टीची जाणीव असायची व त्यामुळेच जरी भांड्याला भांडे लागले तरी त्याचा आवाज सहसा चार भिंतींच्या पलीकडे जायचा नाही. पूर्वी प्रत्येक माणसाला सरासरी तीन ते चार मुले असायची. मुलीचे लग्न होताना पाठवणीच्या वेळी बाप आपल्या मुलीला तुझ्या पाठीवर अजून दोन-तीन जणांची लग्ने होणे बाकी आहेत याची जाणीव करून देत सासरकडच्यांना समजून घे, उलटसुलट बोलू नको पासून हे घर तुला कायमचे बंद इथपर्यंत वेगवेगळे सल्ले दिले जायचे. त्यामुळेच बारीकसारीक काय अगदी मोठ्या प्रमाणावर जरी काही झाले तरी माघारीची वाट आपल्याला बंद असल्याने अन्याय सहन करीत बाई राहायची. हे जरी योग्य नसले तरी ही एका टोकाची बाजू आहे असे समजूया. आज आपण पाहतो आहे ती आहे दुसऱ्या टोकाची बाजू. कारण आज परिस्थिती बदलली आहे. एक तर एकत्र कुटुंब पद्धती संपलेली आहे. त्यामुळे सासू-सासरे (तेही मुलांसोबत राहत असतील तर!) पलीकडे आज दुसरे कोणीही मोठे घरात नाही आणि त्यामुळे लहान ठिणगीही वणवा पेटवून जात आहे. स्त्रिया आज कमावत्या आहेत. नवऱ्यावर अवलंबून राहणारी स्त्री शोधावी लागेल. मात्र आज घरखर्च चालविण्यासाठी स्त्रीला नोकरीसाठी नाइलाजाने बाहेर पडावे लागत आहे. त्यामुळे उलट बऱ्याच ठिकाणी स्त्रियांनी मिळविलेला पगार हा कुटुंबासाठी आधार असतो.

परंत पाहण्यालायक एक गोष्ट आहे ती ही की आज सरासरी घरटे एक वा जास्तीत जास्त दोन मुले असल्याने आज बाप पाठवणी करतानाच आपल्या मुलीला सांगून ठेवतो की मी जिवंत आहे व कुठलीही अडचण आली तर मला सांगायचे आणि नवऱ्याकडच्या कोणीही त्रास दिला तर लगेच निघून यायचे, काही काळजी करायची नाही. हाच काय याच्यापेक्षा सरस छप्पन्न नवरे तुझ्यासाठी उभे करीन... माझ्याकडे लगेच निघून यायचे, मी तुला मेलेलो नाही. या आश्वासनामुळे अर्थातच होते एकच की सामंजस्याची भूमिका जी स्त्री चांगली घेऊ शकते तीच मशाल घेऊन अन्याय शोधू लागली आहे. घटस्फोट व तत्सम दाव्यांचे कारण नवरा-बायकोतील वाद कमी तर ७५ टक्के वेळा आई-वडिलांची फूस असल्याने काडीमोड घेणारा स्त्री वर्ग आज समाजात वाढताना पाहावयास मिळत आहे.

अर्थात सर्व पुरुष धुतल्या तांदळागत स्वच्छ आहेत असे काही माझे म्हणणे मुळीच नाही. शिवाय पोटगी मागितल्यामुळे मुलांकडचे कसे देशोधडीला लागले याचे पण किस्से अनेक आहेत. लग्नाकरिता खास करून वरपक्षाच्या मागण्या पूर्ण करण्याच्या हौसेखातर घेतलेली कर्जे सावकाराकडून घेतलेली असतात. सदर कर्जे फेडता आली नाही म्हणून मरण पत्करणाऱ्यांनी लग्न करतानाच अशी कर्जे काढण्यापासून स्वत:ला आवरायला पाहिजे. स्त्रियांवर खरोखरीच अन्याय होत असतील तर अशा नवऱ्यांना वठणीवर आणण्यासाठी फौजदारी तसेच कौटुंबिक न्यायालयासारखी पायरी (जागा) नाही. मात्र दुर्दैवाने वकील म्हणून एक बाब लक्षात येते की आज कायदाच स्त्रियांची बाजू एवढी घेत आहे की कौटुंबिक न्यायालयात स्त्रियांकडे माप झुकते पडत आहे. नवऱ्यांवर खरोखरीच अन्याय होत असेल तर अशा स्त्रियांना वठणीवर आणण्यासाठी कुठेच योग्य मार्ग वा कायद्याची वाट ठेवलेली नाही. यामुळे बऱ्याच वेळेला खोट्या तक्रारी करण्यापर्यंत स्त्रियांची मजल गेली आहे, हे दुर्दैवाने आता सर्वांच्या लक्षात येत आहे. असो.

सदर पुस्तकात मी अनावश्यक किचकट कायदे मुद्दामहून दिलेले नाहीत. सोप्या भाषेत सामान्य व्यक्तीलाही समजतील अशा बाबी मी ह्या पुस्तकात दिलेल्या आहेत. आपल्यासमोर ४९८ ए हे पुस्तक आणताना मला मनापासून आनंद होत आहे. याचा वापर सर्वांच्या भल्यासाठी व्हावा अशी माझी मनोमन इच्छा आहे. यात पिचलेल्या नवऱ्यांपासून खरंच जिचा छळ होतो आहे अशा स्त्रियांकरिता याचा निश्चितच लाभ व्हावा अशी माझी प्रामाणिक इच्छा आहे. सदर पुस्तक पूर्णपणे संगणकावर टाईप करीत लिहिलेले आहे. या पुस्तकाचे मुद्रणसंस्कार माझे क्रीडा व शैक्षणिक क्षेत्रातील मित्र **श्री. मनोहर साळवी** यांनी केलेले आहे. सदर पुस्तकात दोन शब्द माझ्या लायन्स क्लब ऑफ माहिमचे आताचे **अध्यक्ष लायन श्री. दिलीप भिसे** यांनी लिहिलेले असून या सर्वजणांचे मी मनापासून आभार व्यक्त करीत आहे.

हे पुस्तक लिखाण करण्याची संधी व प्रेरणा मला मनोरमाच्या **श्रीमती विद्या अनिल फडके** यांच्यामुळे मिळाली असून त्यांच्या या पाठिंब्यामुळेच मला ही साहित्यसेवा अखंडित चालू ठेवता येत आहे व यासाठी मी त्यांचा सदैव ऋणी राहीन. हे पुस्तक सर्वसामान्य व्यक्तीसाठी नक्कीच मार्गदर्शन म्हणून उपयोगी ठरेल अशी मला आशा वाटते. वाचक म्हणून आपले माझ्यावरचे प्रेम यापुढेही असेच वाढत राहील अशीच ईश्वरचरणी प्रार्थना करून मी माझे मनोगत इथेच संपवतो. हरि ओम...

**- ॲड. अरुण गोविंद देशमुख**

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १. | ४९८ ए या कायद्याची व्याख्या आणि व्याप्ती | ११ |
| २. | ४९८ ए पुरुष व त्यांच्या नातेवाईकांच्या विरुद्ध वापरण्याचे हत्यार आहे का? | १५ |
| ३. | भारतातील 'स्त्री' ची स्थिती - आजची व उद्याची | २२ |
| ४. | ४९८ ए करिता विवाहित पुरुषास आणि / किंवा त्याच्या कुटुंबीयांना कायद्याने असलेले संरक्षण | २३ |
| ५. | विवाहित महिलांसाठीचा ४९८ ए चा प्रत्यक्ष कायदा | ४१ |
| ६. | फौजदारी कायदा ( दुसरी सुधारणा ) अधिनियम १९८३ ( १९८३ चा ४६ ) | ५७ |
| ७. | महिलांचे कौटुंबिक हिंसाचारापासून संरक्षण करण्याबाबत अधिनियम, २००५ | ६६ |
| ८. | महिलांचा कौटुंबिक हिंसाचारापासून संरक्षण करण्याबाबत नियम २००६ | ८० |
| ९. | महिलांचे घरगुती जुलमापासून रक्षण करण्यासंबंधीचा कायदा, २००५ व नियम २००६ मधील महत्त्वाच्या तरतुदी | ८५ |
| १०. | मुस्लीम समाजातील महिलांसाठीचे कायदे | ९९ |
| ११. | कुटुंब न्यायालय कायदा, १९८४ ( १९८४ चा ६६ ) | ११५ |
| १२. | काही नेहमी विचारले जाणारे प्रश्नोत्तरे | १२४ |

# १. ४९८ ए या कायद्याची व्याख्या आणि व्याप्ती

भारतीय संस्कृती ही पुरुषप्रधान संस्कृती आहे. आपल्या समाजात 'लग्न' हे अतूट बंधन समजले जाते. तसेच 'लग्न' म्हणजे करार नसून एक पवित्र बंधन म्हणून समजण्यात येते. पती-पत्नीचे नाते हे पवित्र नाते आहे. नवोदित पती-पत्नीला तर 'लक्ष्मीनारायणाचा जोडा' असे संबोधण्यात येते यावरून पतीला व पत्नीला किती मानाचे स्थान देण्यात येते हे लक्षात येते.

दोन कुटुंबातील किंवा घरातील स्त्री व पुरुष विवाहबंधनाने एकमेकांशी पती-पत्नी म्हणून बंधनात जोडले जातात आणि संसार करतात. हिंदू धर्मात चार आश्रम सांगितले आहेत. त्यापैकी गृहस्थाश्रमाची सुरुवात लग्नापासून होते.

पूर्वी लग्न झाल्यानंतर स्त्रीला तिच्या नवऱ्याकडून किंवा त्याच्या घरच्या मंडळींकडून शारीरिक, मानसिक त्रास दिला जायचा. अजूनही हे प्रकार पूर्णपणे थांबलेले नाहीत. स्त्रीला दिला जाणारा त्रास हा पैशाकरता, हुंड्याकरता, सासुरवास म्हणून, पतीच्या व्यसनामुळे, मूल होत नाही म्हणून इ. कारणांमुळे दिला जातो. या प्रकारांना आळा बसावा आणि स्त्री-पुरुष समानता यावी म्हणून कायदेशीर उपाययोजना / तरतुदी केल्या आहेत. उदा. हुंडाबंदी कायदा, बलात्कारासंबंधी शिक्षा, नवऱ्याकडून जबरदस्तीने होणाऱ्या त्रासाबाबत घटस्फोट मिळण्याची तरतूद, पत्नी व मुलांना पोटगी, हुंडाबळीबाबत शिक्षा इ. प्रकारे स्त्रियांच्या बाजूने न्याय मिळवून देण्यासाठी विशेष कायदे करण्यात आले आहेत. अशा प्रकारची प्रकरणे हाताळण्याकरिता विशेष न्यायालये, कौटुंबिक न्यायालये इत्यादींची स्थापना करण्यात आलेली आहे.

पूर्वी लग्नाअगोदर हुंडा मागत व लग्न झाल्यावरही अनेक वर्षे त्या मुलीवर तिच्या सासरकडचे माहेराकडून हे आण ते आण असे सुचवत मागील दाराकडून हुंडा मागत असायचे. यामुळे नुसते त्या मुलीचेच आयुष्य नाही तर तिच्या माहेरची मंडळी या हुंड्याच्या जाचातून पिळली जायची. भारत सरकारने या अनिष्ट प्रथेला चाप लावण्यासाठी कायदा कलम ४९८ या क्रूरताविषयक भारतीय दंड संहितेच्या कलमाला पोटकलम देत ४९८ ए हे नवीन कलम वाढवले व त्या कलमाचा म्हणजे ४९८ ए अर्थात हुंडा प्रतिबंधक कायदा संमत केला. या कायद्यामुळे मुलांकडच्या हुंडा मागण्याच्या प्रवृत्तीला

चांगलाच चाप लागला. या कायद्यामुळे मुलीचे लग्न झाल्यापासून ती सात वर्षांपर्यंत कधीही आपल्या सासरकडचे हुंडा मागत असल्यास त्या विरोधात पोलिसांकडे तक्रार करू शकते व त्यांची मदत मागू शकते. यात मुलीनेच तक्रार केली पाहिजे असे नसून तिचे नातेवाईक किंवा शेजारचेसुद्धा याबाबत पोलिसांकडे तक्रार करू शकतात हे लक्षात घेतले पाहिजे. अर्थात मुलीने केलेली तक्रार अधिक परिणामकारक ठरते कारण तीच खऱ्या अर्थाने सदरच्या प्रकाराची बळी ठरलेली असते.

अर्थात हा कायदा करण्यामागच्या मूळ उद्देशालाच आजकाल काळे फासल्यासारखे होत आहे हे नाइलाजाने म्हणावे लागते. कायदा करण्याचा हेतू चांगला जरी असला तरी त्याचा जर स्त्रीने गैरफायदा घ्यायचे ठरवले तर ती पुरुषाच्या (म्हणजेच तिच्या नवऱ्याचा) संपूर्ण कुटुंबाचे आयुष्य उध्वस्त करू शकते हे आता बऱ्यापैकी सर्वांच्याच लक्षात आलेले आहे.

४९८ ए हा कायदा अनन्यसाधारण इतक्याच करीता आहे की खरंच एक अबला स्त्रीला त्याचे खऱ्या अर्थाने संरक्षण मिळते. तिनेच काय शेजाऱ्याने जरी रितसर तक्रार केली तरी पोलिसांसमोर नवऱ्याकडच्यांचे पितळ उघडे पडल्यास बुरा हाल केला जातो. अर्थात १९६० च्या अगोदर महिलांचे शिक्षणाचे प्रमाणही बऱ्यापैकी कमी होते. घरात मुलगा पाहिजे या एका अट्टाहासापोटी लाईनीत तीन-तीन किंवा पाच-पाच मुली जन्माला घालणारी कुटुंबे भारतात कमी नव्हती. अगदी दंगल पिक्चरमध्ये दाखविल्याप्रमाणे फोगट यांच्या संसारात एकूण चार मुली झाल्या. गीता, बबिता, रितू आणि संगीता व त्यानंतर त्यांना एक मुलगा झाला तो दुष्यंत!! सुदैवाने सर्वच्या सर्व क्रीडा क्षेत्रात नाव कमवत आहेत तो भाग वेगळा. मात्र एका पाठोपाठ एक मुलं जन्माला घालण्याचे कारण एका कुस्तीगाराला जन्माला घालणे होते जो फोगट यांचे नाव दुमदुमवेल!!

आणि जेव्हा एका पाठोपाठ एक मुली होत जातात तेव्हा त्या मुलींची आबाळ होतेच. मोठीचे कपडे व शाळेची पुस्तके ही तिच्या नंतर जन्मलेल्या मुलींच्या नशिबी येतात व तीच पुस्तके व कपडे पुढच्याच्या नशिबी असे चालत राहते. हे असे बऱ्याच घरांत होते. माझ्या सासूला चार मुली, सासरे मिलिटरीत, नोकरीनंतर सरकारी नोकरी करताना कमी वयात गेले. चारही बहिणींनी एकमेकांना आधार देत आपापले संसार मार्गाला लावले. जेव्हा अशी

वेळ असते तेव्हा त्या मुलींना आपले माहेर हे परत येण्याचे ठिकाण नसते. त्यामुळे कितीही हालअपेष्टा झाल्या तरीही त्यांची सहन करायची प्रवृत्ती वाढीस लागते. आणि इथेच ते पैशांचे देवाणघेवाण करत एकप्रकारचे ब्लॅकमेलिंग होत असावे असे वाटते. याचे कारण जर एक मुलगी परत आली तर पुढच्या मुलीला स्थळ येणेच बंद व्हायचे. या घरातील मुली चांगल्या वळणाच्या नाहीत हा गैरसमज पसरण्यास ती परत आलेली मुलगी कारणीभूत ठरायची. हीच ती बीजे असावी ज्यामुळे तेव्हाचे मुलीकडचे हवालदिल होत. मुलांकडच्यांचे नको ते लाड व न झेपत असतानाही हुंडा म्हणून पैसे, गाडी किंवा इतर काही मौल्यवान छोट्या-मोठ्या वस्तू दिल्या जायच्या.

इथे एक भाग नक्कीच सांगू इच्छितो. आपल्याकडे दिवाळसण साजरा होतो. हा ऐच्छिक असतानाही मुलाकडचे बोलून दाखवायचे की माझ्या मुलीच्या दिवाळसणाला मी हे दिले व ते दिले किंवा माझ्या पहिल्या मुलाच्या लग्नानंतर झालेल्या दिवाळसणाला माझ्या मुलाला त्याच्या सासरकडच्याने एवढ्या गोष्टी दिल्या, तुझ्या माहेरचे काय देणार आहेत? हे जबरदस्तीचे दिवाळसण अनेक वेळा मुलींच्या घरच्यांच्या पोटात गोळा आणते. तर काही वेळा मुलींकडचे हौसेने करतही असतात तो भाग वेगळा. पण जबरदस्तीने कोणतीही गोष्ट मागणे ही हुंडा मागण्याचेच एक भाग ठरते हे लक्षात घ्यावे.

एवढे कशाला आजही माझ्या घरात मला जेव्हा माझी मुलगी जन्माला आली जिचे नांव अथ:श्री आहे तेव्हा माझ्या बायकोला मी नाराज तर नाही ना? अशी शंका यायची. मी तिला स्पष्ट सांगितलेले होते की जे मूल होईल भले मुलगी असो की मुलगा ते एकच राहील. जर मुलगा झाला तर त्याची लग्नानंतर घरात येणारी बायको म्हणजे माझी सून ही माझी मुलगी असेल आणि जर मला मुलगी झाली तर तिच्या लग्नानंतर जो घरात जावई येईल तो मला मुलासारखा असेल. बस्स!!

यासाठी मला मा. श्री शरदचंद्र पवार हे आदर्श होते. त्यांनी त्यांची मुलगी सुप्रियाला (आताची खासदार सुप्रिया सुळे) आपला मुलगा मानले! अर्थात माझ्या बायकोची आई (म्हणजेच माझी सासू) तसेच माझी आई आडून आडून तुला दुसरा मुलगा होईल असे सांगायचा प्रयत्न करायचे. मात्र माझा स्पष्ट नकार होता. अर्थात या सर्व गोष्टींकडे बघितले तर आजही समाजात मुलगा झाला की जेवढा आनंद होतो तेवढा मुलगी झाली की होताना दिसत नाही.

याला कारणही होते ते भंपक असे. मुलगा झाला म्हणजे आपल्या वंशाचा दिवा तेवत राहील असे मानणारेच दुर्दैवाने समाजात अधिक आहेत. पण आता या विचारात बऱ्यापैकी बदल घडत आहे असे आनंदाने म्हणावे लागेल.

आता लग्नानंतर मुलगी आपले माहेरचे नांव ठेवू शकते. नव्हे आजकाल असे माहेरचे नांव राखण्याचे नवे फॅड आलेले आहे. अर्थात त्यात हा फायदा असतो की माहेरच्या नांवाने केलेल्या सर्व दस्तऐवजांमध्ये नवऱ्याकडच्या नावात बदल करून घेण्याचे टाळता येते. अगदी पासपोर्ट काढतानासुद्धा आता असे नांव बदलले नसल्यास अडवले जात नाही. हा बदल हा मोठा सामाजिक बदल म्हणावा लागेल. हा नुसता वैचारिक बदल नसून स्त्री आपले स्वातंत्र्य लग्नानंतरही राखू पाहते आहे हेच त्यातून प्रतित होते.

आज जेव्हा मुलामुलींकडे आपण पाहतो तेव्हा एक प्रमुख बदल घडलेला आपल्याला जाणवतो. तो म्हणजे पूर्वी जी स्त्री अबला म्हणून होती ती आता बऱ्यापैकी सक्षम झालेली आहे. पुरुषांच्या खांद्याला खांदा लावूनच नाही तर बऱ्याच क्षेत्रात तिने पुरुषांनाही मागे सारायला सुरुवात केलेली आहे. याचा परिणाम असा झाला आहे की आजची स्त्री ही पूर्वीसारखी अबला न राहता तिला सर्व आवश्यक त्या कायदेशीर मार्गांचा रास्ता खुला झालेला आहे आणि अशा वेळेला सक्षम असलेल्या स्त्रीने जर तुलनेने कमी असलेल्या आपल्या नवऱ्याला कायद्याच्या कचाट्यात अडकवला तर त्याची अवस्था फारच वाईट होते. आज पूर्वीसारखी स्थिती राहिली नाही. जेव्हा चार-चार किंवा जास्त मुले एका जोडप्याला व्हायची त्यामुळे एक किंवा जास्तीत जास्त दोन असलेल्या मुलींच्या मागे तिचा बाप व तिची आई पूर्ण ताकदीने उभी राहते. त्यामुळेच पूर्वीची परिस्थिती आज अभावानेच आढळते हे मात्र नक्की.

अर्थात विचारपूर्वक केलेल्या ४९८ ए या कायद्याकडे पाहताना त्याचे उद्दिष्ट हे चांगलेच आहे हे लक्षात येते आणि असे कधीच पूर्वी घडलेले नव्हते असे नसून बऱ्याच मुलींना हुंड्यासाठी आपला जीवही गमवावा लागला आहे. कित्येक मुलींच्या आईने किंवा बापाने मृत्यूला कवटाळले आहे किंवा स्वत:च्या अंगावर कर्जाचे डोंगर उभे केलेले होते. कोणत्याही अपप्रवृत्तीला आळा हा घातलाच पाहिजे हे माझे स्पष्ट मत आहे. त्यामुळे ४९८ ए हा कायदा आपल्या समाजासाठी आवश्यकच आहे असे मला वाटते.

◆◆◆

# २. ४९८ ए पुरुष व त्यांच्या नातेवाईकांच्या विरुद्ध वापरण्याचे हत्यार आहे का?

सुशीलकुमार शर्मा विरुद्ध भारत सरकार आणि इतर २००५ च्या सर्वोच्च न्यायालयाच्या दाव्यात ४९८ ए चा दुरुपयोग करण्यात येत आहे हे स्पष्ट अधोरेखित केलेले असून सर्वोच्च न्यायालयाने अशा प्रकारांसाठी लीगल टेररिझम या शब्दाचा प्रयोग केलेला आहे. यामध्ये मुलाच्या नातेवाईकांना मुद्दामहून छळण्यासाठीच किंबहुना काही वेळा केसेस केल्या जातात असे मत व्यक्त करण्यात आले. अनेक महत्त्वपूर्ण दिशादर्शक बदल सुचवत तक्रार आल्यावर त्याची पडताळणी केली जाऊन मगच अटक केली जावी असा आदेश दिला.

अनेक असे निकाल झालेले असून त्याद्वारे वरील बाब अधोरेखित झालेली आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या खंडपीठाने ज्यात जस्टिस दिपक मिश्रा, जस्टिस डी. वाय. चंद्रचुड व जस्टिस ए. एम. खानविलकर यांनी निकाल देताना वॉरंटशिवाय अटक करण्यावर रोखथाम लावण्यात आलेली आहे. तसेच आरोपी पतीच्या एकूण चारित्र्यानुसार त्याला जामीन मिळू शकतो हे स्पष्ट केले आहे. अर्थात जामीन देताना त्याचे चारित्र्य, त्याच्या पूर्वी सात वर्षांहून अधिक कालावधीच्या कलमासाठी अटक केलेली नव्हती ना हे पाहून त्याला जामीन देताना खबरदारी घेतली जाते. आता ४९८ ए चा दावा एक पत्नी आपल्या पती आणि/किंवा त्याच्या नातेवाईकांविरुद्ध वापरले जाणारे कायदेशीर हत्यार असल्याने सर्वप्रथम आपण त्यांच्या लग्नापासून सुरू करूया.

हिंदूमध्ये हिंदू कायद्याप्रमाणे (याच अटी स्पेशल ॲक्टमध्येही आहेत) खालील अटी आणि शर्थी पूर्ण केल्यावरच लग्न झाल्याचे मानण्यात येते त्या खालीलप्रमाणे :

१) दोन्ही पक्षकार म्हणजेच वधू आणि वर हे लग्नाच्या वेळी एकतर अविवाहित असावे किंवा त्यांचे ज्याच्याशी लग्न झालेले होते त्याचा मृत्यू झालेला असावा (वधू ही विधवा तर मुलगा हा विधुर) किंवा त्या अगोदरच्या जोडीदाराशी कायदेशीररित्या घटस्फोट झालेला असावा.